# दिपोत्सव २०२०

साप्ताहिक **बेरार टाईम्स**

संपादकः-खेमेंद्र कटरे, सहसंपादकः-सुरेश भडाडे

वर्ष -९ | गोंदिया | अंक ४९ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार, दि.१८ नोव्हेंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## महाज्योतीच्या सर्व योजना कागदावरच

**गोंदिया:** साारथी आणि बार्टीच्या धर्तीवर इतर मागासवर्गातील स्पर्धा परीक्षार्थींना प्रशिक्षण व आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या महाज्योती संस्थेला सरकारने अद्याप एकही पैसा दिलेला नाही. सरकारने करोनाकाळातही सारखीला ११ कोटीची मदत करुन १३० कोटीच्या नवीन प्रस्तावाला मंजूरी दिली. मग ओबीसी विद्यार्थी सरकारचे नाहीत का, असा सवाल आता विचारला जात आहे. सरकारच्या या दुजभावामुळे एकही विद्यार्थी अद्याप महाज्योतीचा लाभार्थी नाही.




इतर मागासवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग आणि विमुक्ती जाती आणि भटक्या जमाती या प्रवर्गाचा सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने महाज्योती अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. गेल्या दहा वर्षापासून बार्टी तर एक वर्षापासून सारथी या संस्थेद्वारे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी दिल्लीतील नामवंत शिकवणी वर्गामध्ये मार्गदर्शन केले जाते. याद्वारे दिल्लीतील प्रशिक्षणासाठी २ लाख ५० हजार रुपये, निवासासाठी १ लाख ५० हजार रुपये, पूर्वपरीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ५० हजार रुपये तर मुख्य परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्याला समोरील प्रशिक्षणासाठी २५ हजार रुपये दिले जातात. परंतु वरील दोन्ही योजना या फक्त अनुसूचित जाती व मराठा-कुणबी या वर्गासाठीच असल्यामुळे आजपर्यंत एकाही ओबीसी विद्यार्थ्याला याचा लाभ मिळाला नाही. या वर्षीसुद्धा बार्टी व सारथी या दोन्ही संस्था नागरी सेवा पुर्वपरीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या दर्जेदार प्रशिक्षणासाठी ५० हजार रुपयांची मदत करणार अहेत. या धर्तीवर महाज्योतीतर्फे या वर्षी योजना सुरु करणे अपेक्षीत होते. मात्र सरकारकडून महाज्योतीला कुठलीही आर्थिक मदत मिळाली नाही.


## फरार नक्षली कमांडर पोलिसांच्या ताब्यात

**गोंदिया**-गोंदिया जिल्ह्यात गेल्या काही वर्षापुवी नक्षल चळवळीत सक्रीय राहिलेल्या परंतु त्यानंतर चळवळ सोडून १० वर्षापासून फरार राहून सुकमा जिल्ह्यातील

एका गावात जिवनव्यतीत करीत असलेल्या देवरी दलमच्या कमांडरला गोंदिया पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारावर ताब्यात घेतल्याची माहिती गोंदियाचे अप्पर पोलीस अधिक्षक अतुल कुलकणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालदंर नालकुल यांनी पत्रकार परिषदेत दिली.सदर



नक्षलीचे नाव रमेश उर्फ हिडमा मडावी असे आहे.१९९८-१९९९ मध्ये नक्षल मध्ये भरती झालेला होतात्याच्यावर १३ गुन्हे दाखल आहेत न्यायालयात हजर करून पाच दिवसाचा पीसीआर मिळालेला आहे. पोलीस उपनिरिक्षक अभयसिंह शिंदे सह सी ६० च्या देवरी पथकाने छत्तीसगड राज्यातील सुकमा येथे जाऊन १० नोव्हेबंरला ताब्यात घेतले.याच्यावर १२ लाखाचे पुरस्कार होते.



















page 50.indd 1 11/17/2020, 9:03 PM

साप्ताहिक **बेरार टाईम्स** निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com दिपोत्सव बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२० (2)

## संपादकीय

# सोशल मीडिया आणि तरुणाई

सध्याच्या स्थितीत सोशल मीडियामुळे शांतता आणि स्थैर्य धोक्यात आले आहे. सामाजिक अस्थिरता जाणवू लागली आहे. लोक कृतीपेक्षा मतांवर जास्त भरवसा ठेऊ लागली आहेत. सामाजिक व वैयक्तिक समस्या निराकरण, शिक्षण किंवा थोडीशी करमणूक असा उद्देश जर ठेवला तर काही चुकीचे नाही, परंतु त्या व्यतिरिक्त तासनतास जर चॅटिंग, व्हीडिओ बघत बसण्याच्या सवयींमुळे मात्र अनेकांनी आपली मानसिक स्थिरता गमावली आहे. सोशल मीडिया ही काही वैश्विक समस्या नाही, परंतु तिचा अतिरेक प्रत्येक व्यक्तीसाठी नुकसानदायक ठरू शकतो. त्यामुळे अतिरेक होऊ न देता गरजेपुरता नियंत्रित सोशल मीडियाचा वापर करणेच हितावह आहे. व्यक्तिगत स्तरावर सामाजिक बांधिलकी राखणे आणि त्यामुळे संवाद साधणे गरजेचेच आहे. असा संवाद हा कधी वाद असू नये. समाजाचा कुठलाच घटक त्याद्वारे दुखावला जाऊ नये. जेवढ्या संस्था आणि व्यक्ती सोशल मीडियावर आहेत त्यांच्याद्वारे समाजातील सर्व घटक एकत्र येऊ लागले आहेत.

संपूर्ण जग एका व्यासपीठावर आलेले आहे. याचा उपयोग फक्त एखादी समस्या निराकरण आणि निव्वळ मनोरंजन यासाठी झाला पाहिजे. सोशल मीडिया हे आज टीव्हीपेक्षा प्रभावी माध्यम ठरत आहे. इंटरनेटचे जाळे सर्व जगभरात पसरले असताना त्या इंटरनेटचा वापर प्रत्येक व्यक्ती करू लागला आहे. मोबाईल आणि संगणक ही माध्यमे त्यासाठी प्रभावी आहेत ज्यांचा उपयोग आज सर्रास सर्वजण करू लागले आहेत. आजच्या तरुणाईकडे बघितले तर हातात मोबाईल त्यावर सोशल मीडिया आणि दोनशे अडीचशे रुपयांचा डाटा असला की महिनाभर सर्व काही विसरून सोशल मीडिया चालवणाऱ्या तरुणाईला सर्वच गोष्टीचा विसर पडला आहे. फक्त सोशल मीडिया आणि त्याद्वारे मनोरंजन एवढेच त्यांचे काम ठरले आहे. या सोशल मीडियाने तरुणाचा डोक्यातील रोजगार, नोकरी या गोष्टी विसरून वेगळ्याच दुनियेत रममाण झालेले आहेत. आपले शिक्षण, आपला समाज आहे याचे भानही आहे की नाही हा संशोधनाचा विषय बनला आहे. सुशिक्षित तरुणांचे प्रश्न, महिलांचे प्रश्न गलिच्छ झालेले राजकारण, देशपातळीवरचे प्रश्न यावर चर्चा होताना तर दिसत नाही. याची जाणीवही आजच्या तरुणाईला राहिलेली नाही. शिक्षणाचा फायदा समाजासाठी करून घेण्याची क्षमता युवकांमध्ये आहे ही गोष्ट लोप पावत जात आहे.

शिकलेले युवक युवती जागृत आहेत असे म्हणणे चुकीचे ठरेल. सोशल मीडियाचा फक्त मनोरंजन म्हणून वापर करून सत्याची जाणीव नसलेली पिढी निर्माण होत आहे आणि यामध्ये मुली आघाडीवर आहेत. कोणत्याही सुविधेचा मर्यादित व योग्य वापर केला तर त्याचा चांगला परिणाम होतो. आजची तरुणाई अमर्यादित आणि अयोग्य वापरच जास्त करून सोशल मीडियाला फक्त मनोरंजनाचे साधन समजून निव्वळ आगाऊपणा सुरूआहे. अनेक प्रकारचे सोशल मीडिया आपल्याकडे आहेत. पण त्यांचा चांगला उपयोग करून घेणा?्या तरुणाईची संख्या किती, हा मात्र प्रश्नच आहे. तरुणाई आज स्वत:च्या समस्या, शेतक?्यांच्या समस्या, समाजाच्या समस्या, देशाच्या समस्या यापासून खूप दूर आहे किंबहुना हे विषय त्यांच्या डोक्याच्या पलीकडचे आहेत असेच म्हणावे लागेल. सोशल मीडिया आणि कमी दरात जास्त डाटामुळे बेरोजगारी तरुण तर विसरुनच गेला. सोशल मीडिया वापरून मानसिक समाधान हाच त्याचा रोजगार बनला आहे. महिन्याचा डाटा मिळवण्यासाठी कोणाकडून पैसे घ्यायचे याचा विचार अगोदरच डोक्यात असलेल्या तरुणाईला आठ दिवसाचा घरात किराणा कसा आणायचा याचे नियोजन आजही जमलेले नाही. आई वडिलांना स्वत:च्या कमाईमधून औषधी देण्याच्या दिवसात आई वडिलांकडून पैसे घेऊन तंबाखू खाणा-या तरुणांची संख्या कमी नाही. थोडक्यात सोशल मीडियाने बऱ्याच गोष्टीचा आपल्याला विसर पाडलेला आहे. परंतु आजही आपण बघतो काही गोष्टीचा विसर पडणे शक्य नाही अशा गोष्टींवर चर्चा, प्रबोधन होणे गरजेचे आहे जसे जाती व्यवस्था, आंतरजातीय प्रेमामुळे कितीतरी तरुणाईचे जीवन उद्धवस्त झालेले आहे.

बलात्कार, शेतकरी स्वहत्या, असे अनेक प्रश्न आमच्या समोर असताना फेसबुक किंवा टिकटॉक वर किती लोक याविषयी बोलतात? एकिकडे ओरड आहे प्रस्थापित मिडीया सर्वसामान्य लोकांचा आवाज दाबतो, सर्व सामान्य लोकांना न्याय मिळू देत नाही. दुस?्या बाजुने आम्ही कुठे सोशल मिडियावर पाहिजे तो आवाज उठवतो, आम्ही कुठे सोशल मीडियाचा वापर न्याय मिळवून देण्यासाठी करतो? आम्ही सोशल मीडियाचा वापर माहितीचे दळणवळण होण्यासाठी नाही तर फार फार एकमेकांच्या उचापती करण्यासाठी करतो. महिलावर बलात्कार झाले तर रस्त्यावर येऊन ओरडणारे खूप आहेत, पण त्याच्या हातात असलेल्या सोशल मीडियावर वेगळेच आहेत.

आज फेसबुक, व्हॉट्सअॅपसारख्या माध्यमातून किती लोक जाती व्यवस्था, शेतकरी आत्महत्या, बलात्कार, शिक्षण यावर लिखाण करतात वा जनजागृती करतात याचे उत्तर आहे ङ्गनगन्यफ! कोट्यवधी तरुणाईकडे सोशल मीडिया असताना मोजकेच लोक एखाद्या वेळी सामाजिक पोस्ट टाकतात नाहीतर, सोशल मीडियावर फक्त निव्वळ उथळपणा करतात, हे कशाचे लक्षण आहे? सकाळी उठल्याबरोबर मोबाईल हातात येतो. आपोआप आपल्याला हवे ते मनोरंजन आणि हवी ती कोणत्याही क्षेत्रातील माहिती सहज मोबाईल स्क्रीनवर ओपन होऊ शकते. पण अशा तंत्रज्ञानाचे आणि विशेषकरून सोशल साईट्सचे फायदे आणि नुकसान देखील जाणून घेतले पाहिजेत नाहीतर एका वैज्ञानिक विकासात मानवी क्षमतांचा पूर्ण विनाश होऊन जाईल. सोशल मीडियामुळे सर्व समाज, लोक एकत्र आले. विचारांची आणि संस्कृतीची देवाणघेवाण शक्य झाली. देशातील व्यक्ती जगात कुठल्याही व्यक्तीशी सहज मैत्री करू लागला. मानवी आणि नैसर्गिक समस्यांचे निराकरण होऊ लागले. एका विचारांचे लोक भारावून जाऊन ग्रुप बनवू लागले मग कृतीसाठी देखील एकत्र येऊ लागले. राजकीय व्यक्ती, अभिनेते, सामाजिक संस्था असे सर्वजण सोशल मीडियावर कार्यरत झाले त्यामुळे त्यांची लोकांपर्यंत झेप वाढली. आपले मत सर्वदूर पसरवता येऊ लागले. वरील फायदे वरवरचे आहेत जर तुम्ही फक्त सोशल साईट्सचा वापर मनोरंजनासाठी करत असाल. असे मनोरंजन मग वेळखाऊ देखील ठरू शकते. पूर्ण दिवस लोक मोबाईल आणि संगणकावर बसून असतात. त्यामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते. डोळ्यांचे विकार, पाठदुखी, डोकेदुखी असे विकार जडू शकतात. सोशल मीडिया जास्त फोफावल्यामुळे चुकीच्या बातम्या आणि अफवा यांचा ऊत येऊ लागला आहे. लहान मुले तर संस्कारित न होता मनोरुग्ण होऊ लागली आहेत. लहान वयातच हे माध्यम हाती आल्यामुळे नको तेवढा वापर केला जातो. याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. सायबर चोरीसारखे गुन्हेगार तयार होण्यासाठी हे एक माध्यम/कारण ठरूशकते. हॅकिंगसारख्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून यामुळे पैसे मिळवण्याचे अनेक गैरमार्ग मुलांना समजू लागले आहेत, जे योग्य नाही. अभ्यास करताना सोशल मीडिया साइट्स चेक करत राहण्यामुळे एकाग्रता भंग पावते. परिणामी, अभ्यासातील लक्ष कमी कमी होत जाताना दिसते. दुस?्यांच्या ग्लॅमरस पोस्ट आणि फोटोज पाहून आपल्यालाही ते सुख मिळायला हवं, असं त्यांना वाटू लागतं. मात्र यासाठी कोणत्याही प्रकारची मेहनत करण्याची त्यांची तयारी नसते. कोणतीही गोष्ट चटकन आणि सहजासहजी घडावी असे अनेकांना वाटू लागते. सोशल मीडिया एखाद्या दुधारी तलवारीसारखे आहे. याचा योग्य वापर केला, तर फायदा आहे अन्यथा त्याच्या आहारी जाऊन नको ती पावले उचलली, तर आयुष्याची वाट लागायला वेळ लागणार नाही हेही लक्षात घेतले पाहिजे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करून डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# एक दिवाळी, आदिवासींबांधवासोबत:४८ गावात दिवाळीचे साहित्य भेट




**गोंदिया:::-** सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचारी कुटुंबीयांसमवेत दिवाळीचा आनंद साजरा करीत असतानाच नागरीकांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, यासाठी पोलिसांना मात्र दिवाळी यावेळी एक दिवाळी आदिवासीसोंबत हे ब्रीद घेत यावेळच्या दिवाळीत नक्षलग्रस्त अतिदुर्गम गावातील आदिवासीं बांधवांना कोरोनाच्या काळातील आर्थिक संकटाची बाजू लक्षात घेत दिवाळीउपयोगी साहित्य आणि मिठाई, शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तूसंह साडी, धोतर आदी साहित्यांचे वितरण करुन लक्ष्मीपुजनापासून तर भाऊबिजेंपर्यंत हा सण त्यांच्यासोबत साजरा करण्यास सुरवात केली आहे. पोलीस अधिक्षक विश्व पानसरे आणि अप्पर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम उपविभागीय पोलीस अधिकारी जालंदर नालकुल आणि नक्षलग्रस्त भागातील सर्व ठाणेदार, दुरक्षेत्र चौकीतील प्रभारी पोलीस अधिकारी यांनी राबवून एक नवीन संदेश दिला आहे. या सामाजिक कार्यात विविध सामाजिक संघटनांनी मदत केली यामध्ये गोंदिया व नागपूर येथील संस्थांचाही सहभाग आहे. गेल्यावर्षी पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम राबवण्यात आलेला होता, हे विशेष.

दिवाळीसाठी इतर शासकीय कर्मचाऱ्यांना सुट्या मिळत असल्याने सर्वांना आनंदोत्सव साजरा करता येतो. मात्र कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच रात्रीची गस्त घालून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणारे पोलिस दिवाळीत २४ तास ड्युटीवर पहायला मिळतात.

सदर उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील देवरी, चिचगड, केशोरी, सालेकसा, नवेगावबांध व डुग्गीपार, मुरकुटडोह, बोंडे, दरेकसा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अतिदुर्गम भागातील ६२ गावापैकी ४८ गावामध्ये दिवाळीची भेट म्हणून पोलीस विभागाच्यावतीने २००५ साड्या, २००५ ब्लॉकेट, ७७५ टी शर्ट, २५०धोतर, ७५० टिपीन, २००० मास्क, ५० व्हॉलीबॉल किट, १९८ क्रिकेट किट, २००० चप्पल, जुते, ५० फुटबॉल किट, ७०० स्कुलबॅक, ९५० स्टील ग्लास, ६५० पानी बॉटल, २०१० मिठाई बॉक्स, फरसान यांच्यासह जिवनावश्यक वस्तु व मुलांना शालेय आणि खेळाचे साहित्य वितरित करण्यात आले. या सर्व मोहिमेत पोलीस कर्मचारी, अधिकारी, सी ६० जवानांचे पथक, संबधित गावातील पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक व विविध मंडळाचे पदाधिकारी सहभागी झालेले होते.



सभी नागरिकों, ग्राहकों को दीपावली की हार्दिक शुभकामनाएँ

**श्री हलवाई होटल असोसिएशन**
श्री टॉकीज रोड, गोंदिया-४४१६०१
फोन नं.(०७१८२) २३७५५६, २३७०७३

☆सर्व सुविधायुक्त आरामदायक व सबसे किफायती ए.सी.कमरे, एवं ए.सी. डोरमेट्री रुम ४००/- अत्यंत उचित किराये पर उपलब्ध. ☆शादी-विवाह, पार्टी या किसी भी बडे से बडे कार्यक्रम के लिए. ☆ताड़पत्री, दरी, कुर्सियॉ, गद्दे, चादर, लोड़, कम्बल बर्तन हलवाई का सामान की अत्यंत उचित किराये में व्यवस्था.

नरेंद्रकुमार चांदवानी अध्यक्ष | नरेशकुमार अग्रवाल कोषाध्यक्ष | अशोककुमार चौधरी सचिव
एवं समस्त सदस्यगण.

# उत्पादन, क्षेत्र निहाय शेतकऱ्यांच्या यादी नुसारच होणार धान खरेदी

**गोंदिया:** शेतकऱ्यांच्या नावावर बोगस सातबारा उतारा सादर करुन शासकीय धान केंद्रावर धान विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा गैरप्रकार केल्याची बाब जिल्ह्यातील अनेक केंद्रावर घडलेल्या प्रकारावरुन उघड झाली आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी आता प्रशासनाने नवीन शक्कल लढवत उत्पादन क्षेत्र व क्षेत्रनिहाय शेतकऱ्यांची यादी नुसारच धान खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तूर्तास जिल्ह्यातील धान खरेदीची प्रक्रिया ठप्प आहे. सदर यादी तलाठी द्वारा प्रमाणित केल्यानंतरच शेतकऱ्यांकडील धान खरेदी केले जाणार आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांची यादी प्रमाणित होत नाही तोपर्यंत धान खरेदी सुरू होणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी अंधारातच जाणार हे मात्र निश्चित. पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पादन होते. शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ आणि जिल्हा पणन कार्यालयाअंतर्गत उपअभिकर्ता संस्थांच्या माध्यमातून धान खरेदी केली जाते. या शासन मान्य धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांचे धान खरेदी करुन मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. यासंदर्भात धान घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी विशेष समिती नियुक्त करुन धान घोटाळ्याची चौकशी सुरू आहे. धान केंद्रावर धान खरेदीत होणाऱ्या गैरप्रकारावर आळा बसावा या उद्देशाने प्रशासनाने धानाचे निश्चित क्षेत्र आणि धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांची यादी तयार केली जाणार आहे. ही यादी तलाठी यांच्याद्वारे प्रमाणित केली जाईल. त्यानंतर सदर यादी संबंधित धान खरेदी केंद्रावर दिली जाईल. शेतकऱ्यांचे यादीत नाव असल्याची खात्री झाल्यानंतर शेतकऱ्यांना धान विक्री करता येणार आहे. शासनाच्या या निर्णयाने निश्चितच धान खरेदीतील गैरप्रकारावर आळा बसेल. असे असले तरी ऐन दिवाळीच्या तोंडावर शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे अद्यापही जिल्ह्यातील अनेक धान खरेदी केंद्र सुरू झाले नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तलाठीद्वारे प्रत्येक गावातील शेतकऱ्यांची धान उत्पादन व क्षेत्रनिहाय सूची प्रमाणित होणार असल्याने बनावट सातबारा जोडून धान विक्री करणाऱ्यांना चपराक बसणार आहे. हा निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेण्यात आला आहे. धान खरेदीस थोडा उशीर लागणार असून सूची प्रमाणित झाल्यानंतरच धान खरेदी करणे सोयीचे होणार असल्याचे जिल्हा पणन अधिकारी पाटील यांनी सांगितले.

**महाराष्ट्र राज्य विद्युत क्षेत्र तांत्रिक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या: भंडारा**
कार्यक्षेत्र-भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्हा
मुस्लिम लायब्ररी चौक, अंसारी वार्ड, भंडारा-४४१९०४ फोन :(०७१६४) २५३१९७ मो.नं.९४०५६४३१५
गोंदिया शाखा-रामनगर पॉवर हाऊस समोर, मो/नं.९१५८७८३१०३

**तांत्रिक कामगाराचे हीत जोपासणारी भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील एकमेव संस्था**

-: संस्थेची ठळक वैशिष्टये :- ★सभासदांच्या निरनिराळ्या प्रकारच्या कर्जाच्या मागण्या व वाढत्या आर्थिक गरजा लक्षात घेता संस्थेने सर्वसाधारण कर्ज मर्यादेत वाढ करुन सर्वसाधारण कर्ज १२००,००० रुपये व आकस्मिक कर्ज २०,०००/- रुपये प्रमाणे सभासदांना आवश्यकतेनुसार वाटप करण्यात येते ★सभासदांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसास आर्थिक मदत रु.१०,०००/- ★मृत सभासदाचे वारसास, सभासद कल्याण निधी योजनेअंतर्गत रु.३,५०,०००/- ची आर्थिक मदत ★सेवानिवृत्त सभासद तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ★संस्थेच्या मालकिची भंडारा व गोंदिया येथे भव्य इमारत ★माहे जुलै १९९६ पासून गोंदिया येथे संस्थेची शाखा कार्यरत.

संस्थेची ३१/०३/२०१९ अखेर सांपत्तिक स्थिती

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल: | ५,००,००,०००/- | गुंतवणुक : | १४,७५,८४५ |
| शुद्ध नफा | ४,५२,७८९ | वैयक्तीक भागधारक मर्यादा | २,००,००० |
| वसुल भाग भांडवल | ३,००,६९,५१९ | राखीव व इतर निधी | २,००,१५,८६७ |
| सभासद ठेवी | ९,१९,२१,५१९ | सभासद संख्या | ६३० |


श्री.डी.एस.पंचबुद्धे अध्यक्ष | श्री.के.डी.बडवाईक सचिव

-: संचालक मंडळ :-
श्री.पी.एस.शिंदे, श्री.ए.बी. कुरेशी, श्री.एस.बी.रहांगडाले, श्री.बी.एस.बावणे, श्री.आर.पी.कुथे, श्री.ए.बी.मेश्राम, श्री जे.एस. ढोमणे, कु.एस.के. उरकुडे (महिला प्रतिनिधी), सौ.पी.जी. बिसेन (महिला प्रतिनिधी), श्री.डी.बी. डोंगरे (तज्ञ संचालक) श्री.व्ही.एस. निकुडे (कार्यकारी संचालक )

-: कर्मचारी वृंद :-
श्री.व्ही.एस.निकुळे (व्यवस्थापक) | श्री.के.जी.खोब्रागडे (वरिष्ठ लिपीक) | श्री.अतुल उध्दवराव धांडे कनिष्ठ लिपीक १
श्री.सी.डब्ल्यू चिचमलकर कनिष्ठ लिपीक १ | श्रीमती जे.ए.द्रव्यकार कनिष्ठ लिपीक २ | श्री.आर.के.मानवटकर वसुली सहाय्यक
श्री.जी.एन.गाठे शिपाई


विदयुत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (र.नि.एन.जी.पी.१०२९) गोंदिया परिमंडळ, गोंदिया
कृष्णा बडवाईक प्रादेशीक कार्यकारिणी सहसचिव | ए.बी.कुरेशी अध्यक्ष | एस.बी.रहांगडाले सहसचिव | डी.एस.पंचबुद्धे उपाध्यक्ष | सुनील बांन्ते सचिव | अविनाश हेमणे संघटक

# रेल्वेस्थानकाच्या समस्यांना घेऊन महाप्रबंधकांशी चर्चा



**गोंदिया:** शहरातील रेल्वे स्टेशनमधील समस्यांना घेवून खा.प्रफुल्ल पटेल यांनी दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेचे मुख्य महाप्रबंधक गौतम बॅनजी व मंडल रेल प्रबंध नागपूर यांना पत्र पाठवून भ्रमणध्वनीवर चर्चा केली. दरम्यान रेल्वे स्टेशनमधील समस्या संदर्भात चर्चा करून रेल्वेचे बंद असलेले पादचारी पुल सर्वसामान्य नागरिकांकरीता सुरू करण्यात यावे व इतर समस्या मार्गी लावण्यात यावे, अशी विनंती केली.

गोंदिया रेल्वे स्थानकाने शहराला दोन भागात विभाजीत केले आहे. यामुळे नागरिकांना दुस?या बाजुला जाण्याकरीता मोठी कसरत करावी लागते. मार्ग नसल्याने रेल्वेच्या पादचारी पुलाचा नागरिक आधार घेत असतात. परंतु, लॉकडाऊन काळात रेल्वे-सेवा बंद असल्याने रेल्वेतर्फे पादचारी पुल बंद करण्यात आले होते. यामुळे नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत होता. या संदर्भात काही नागरिकांना खा.प्रफुल्ल पटेल यांच्याकडे फिर्याद मांडून उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्यावर खा.प्रफुल्ल पटेल यांनी दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेचे मुख्य महाप्रबंधक गौतम बॅनजी व मंडल रेल प्रबंध नागपूर यांना पत्र पाठवून भ्रमणध्वनीवर चर्चा केली. टप्प्याटप्प्याने रेल्वेच्या सेवा सुरू होत आहेत. तसेच गोंदिया रेल्वे स्थानकातून महाराष्ट्र एक्सप्रेस, विदर्भ एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस नियमित धावत आहेत. यामुळे प्रवाशांना दक्षिण भागात असलेल्या तिकीट घरात जाण्यासाठी मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे समस्या निर्माण झाली आहे. याकरीता रेल्वे दोन्ही पादचारी पुल, तिकीट घराला जाणारा पुल सुरू करण्यात यावे, अशी विनंती खा.पटेलांकडून करण्यात आली. यावर त्वरीत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेचे मुख्य महाप्रबंधक गौतम बॅनजी यांनी चर्चेदरम्यान खा.प्रफुल्ल पटेलांनी दिले.




page 50.indd 2 11/17/2020, 9:03 PM


दिपावली
के पावन पर्व पर
हार्दिक शुभकामनाएँ
शुभेच्छुक
रविकांत (गुड्डु) खुशाल बोपचे


गोंदिया जिल्ह्यातील समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
डॉ.नामदेवराव किरसान
अध्यक्ष
गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटी



समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
-: एक शुभेच्छुक :-
(एच.बी.)


समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
-: एक शुभेच्छुक :-
(झेड.पी.सी.)


समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
-: एक शुभेच्छुक :-
(एम.बी.)


समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
-: एक शुभेच्छुक :-
(पी.डी.)


समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
-: एक शुभेच्छुक :-
(व्ही.डी.)


Disclaimer: This Map of India is only a creative representation and must not be used for reference purposes.
एक देश म्हणून आपण अंधाराचा सामना करू.
ऐक्य आणि आपुलकीनी चांगुलपणाचा प्रकाश पसरवूया.
अदाणी ग्रुप शुभेच्छा देत आहे की तुमची आणि तुमच्या जीवलगांची दिवाळी आनंददायक आणि सुरक्षित जावो.
/AdaniOnline
adani Growth with Goodness